# दैनिक 'पुढारी' व 'अ कन्सल्टन्सी'तर्फे कोल्हापुरात आज ए.आय. कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

भविष्यातील कृत्रिम बुद्धिमत्ता युग आत्मसात करण्याची सुवर्णसंधी आज कोल्हापूरकरांना मिळणार आहे. दै. 'पुढारी' आणि 'अ कन्सल्टन्सी' यांच्या संयुक्त विद्यमाने 'बेसिक्स ऑफ ए.आय. अँड ए.आय. टूल्स' ही एकदिवसीय कार्यशाळा शुक्रवारी (दि. १८) ताराबाई पार्कातील स्वामी विवेकानंद कॉलेजमध्ये आयोजित करण्यात आली आहे.

या कार्यशाळेत तज्ज्ञ मार्गदर्शक डॉ. अमेय पांगारकर आणि प्रसाद कुलकर्णी हे चॅट जीपीटीसह प्रेझेंटेशन, वेबसाईट, व्हिडीओ निर्मिती आणि कंटेंट रायटिंगसाठी उपयुक्त २० हून अधिक ए.आय. टूल्सचे प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण देणार आहेत. विद्यार्थी, व्यावसायिक, नोकरदार, गृहिणी अशा सर्वांसाठी ही कार्यशाळा उपयुक्त ठरणार आहे. या कार्यशाळा सशुल्क असून, याला उत्तम प्रतिसाद मिळाला आहे.

सकाळी ९.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत होणाऱ्या या कार्यशाळेतून बदलत्या तंत्रज्ञानासोबत स्वतःला अपडेट ठेवण्याची उत्तम संधी मिळणार आहे. ही कार्यशाळा सांगली, सातारा, कराड येथेदेखील होणार आहे. अधिक माहिती व नाव नोंदणीसाठी तन्वी आंबेरकर ७७५८९४५३२४, रोहित जोशी ९८३४४३३२७४ यांच्याशी संपर्क साधावा.

पुढारी | कोल्हापूर | शुक्रवार, १८ जुलै २०२५

# खेळाडू जन्मतारखेत फेरफार केल्यास कठोर कारवाई

## क्रीडा उपसंचालक सुहास पाटील : मनपास्तर शालेय क्रीडा स्पर्धा नियोजन बैठक

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

जन्मतारखेत फेरफार करून अधिक वयाचे खेळाडू खेळविल्यास तसेच स्पर्धा संयोजनात अडथळा निर्माण करणे, खोटी माहिती देणे या बाबी निदर्शनास आल्यास गंभीर दखल घेऊन कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा देत नियम व अटींचे काटेकोर पालन करून आणि खिलाडू वृत्ती जपत शालेय क्रीडा स्पर्धा यशस्वी करण्याचे आवाहन क्रीडा उपसंचालक सुहास पाटील यांनी केले.

सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील कोल्हापूर मनपास्तर शासकीय शालेय क्रीडा स्पर्धांची नियोजन सभा गुरुवारी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या ग्रंथालय हॉलमध्ये झाली. कोल्हापूर महानगरपालिका शिक्षण मंडळ व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या वतीने आयोजित नियोजन सभेत पाटील यांनी मार्गदर्शन केले.

**पंच व खेळ अधिकाऱ्यांचा निर्णय अंतिम राहील**

जिल्हा क्रीडा अधिकारी विद्या शिरस यांनी स्पर्धेसाठीच्या नियमांची माहिती दिली. यात स्पर्धा प्रवेशिका मुदतीत भरावी, लॉटस् देलेल्या वेळेत शाळेच्या शिक्षकांच्या उपस्थितीतच पडतील. नियोजित वेळेपूर्वी क्रीडा शिक्षक व खेळाडूंनी रिपोर्टिंग करावे. खेळाडूंच्या वयाचा दाखला, शाळा रजिस्टर साक्षांकित प्रत, ऑनलाईन प्रवेशिका, ओळखपत्र, जन्म दाखला, आधार कार्ड, पासपोर्ट आदी कागदपत्रे बंधनकारक आहेत.

प्रवेशिकेवर ज्या क्रीडा शिक्षकांचे नाव आहे त्यांची उपस्थिती अनिवार्य असेल. खेळाडूंना स्पोर्टस् किट सक्तीचे असेल. १४ वर्षाखालील खेळाडूंना शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र आवश्यक. परराज्यातील खेळाडूंच्या कागपत्रांची कठोर तपासणी, उत्तेजक द्रवांचा वापरावर बंदी, स्पर्धेच्या ठिकाणी अस्वच्छता, शांतता भंग होणार नाही याची काळजी क्रीडा शिक्षकांनी घ्यावी. राष्ट्रीय स्पर्धेकरिता पात्र खेळाडूंची वय पडताळणी चाचणी शाळांना अनिवार्य असेल.

पंच व सबंधित खेळ अधिकारी यांचा निर्णय अंतिम राहील. संघटनात्मक व वैयक्तिक वाद करू नयेत. कोणत्याही कारणास्तव खेळाडूस दुखापत झाल्यास संयोजन समिती जबाबदार राहणार नाही. प्रथमोपचार देण्यात येतील. स्पर्धा कालावधीत विद्यार्थ्याचा अपघात अथवा दुखापत झाल्यास राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजने अंतर्गत कार्यवाही होईल आदी गोष्टींचा समावेश होता. सहविचार सभेत क्रीडा शिक्षक यांनी ऑनलाईन प्रवेशिका, प्रमाणपत्र, सलंग्रता फी, शहराच्या फुटबॉल / क्रिकेट स्पर्धा अन्य ठिकाणी न घेता विभागीय क्रीडा संकूल अथवा छ. शिवाजी स्टेडियम येथे घेण्यात याव्यात, अशी सूचना केली.

सभेला तालुका क्रीडा अधिकारी सुधाकर जमादार, बाळासाहेब कांबळे, क्रीडा मार्गदर्शक सीमा पाटील, रविभूषण कुमठेकर, अनिकेत बोडके, क्रीडा कार्यकारी अधिकारी सोनल सावंत, क्रीडा विकास अधिकारी अजिंक्य चौगुले, प्रा. महेश कदम, प्रा. समीर पठान, प्रा. प्रशांत कांबळे, संदीप जाधव उपस्थित होते. प्रास्ताविक प्रशासनाधिकारी प्राथमिक शिक्षण समिती डी. सी. कुंभार यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. संतोष कुंडले यांनी, स्वागत डॉ. विकास जाधव यांनी आणि आभार प्रदर्शन मनपा क्रीडा निरीक्षक सचिन पांडव यांनी केले.



**कोल्हापूर : क्रीडा स्पर्धेच्या नियोजन सभेचा प्रारंभ करताना विभागीय उपसंचालक सुहास पाटील, जिल्हा क्रीडा अधिकारी विद्या शिरस, डी. सी. कुंभार, बाळासाहेब कांबळे, सचिन पांडव, सुधाकर जमादार, महेश कदम आदी.**

सकाळ TODAY

कोल्हापूर, शुक्रवार, १८ जुलै २०२५

# खोटी माहिती दिल्यास गंभीर दखल

## क्रीडा उपसंचालक ; शालेय क्रीडा स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर बैठक

■ सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. १७ : जन्मतारखेत फेरफार करून अधिक वयाचे खेळाडू खेळविल्यास, स्पर्धा संयोजनात अडथळा आणल्यास, खोटी माहिती देण्यासारख्या बाबी निदर्शनास आल्यास गंभीर दखल घेण्यात येईल, असे क्रीडा उपसंचालक सुहास पाटील यांनी सांगितले.**




कोल्हापूर : महानगरपालिकास्तर शासकीय शालेय क्रीडा स्पर्धेसाठी शहरातील क्रीडा शिक्षकांच्या सहविचार सभेत बोलताना उपसंचालक सुहास पाटील. सोबत अन्य अधिकारी.

महानगरपालिकास्तर शासकीय शालेय क्रीडा स्पर्धा २०२५-२६ आयोजन करण्यात येणार आहे. त्यासाठी विवेकानंद महाविद्यालयामध्ये शहरातील सर्व क्रीडा शिक्षकांची सहविचार सभा झाली. महानगरपालिका, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, विवेकानंद महाविद्यालय यांच्या सहकार्याने ही सभा झाली.

उपसंचालक पाटील म्हणाले, 'क्रीडा शिक्षक व खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी शालेय जीवनातील स्पर्धा महत्त्वपूर्ण असतात. स्पर्धा संयोजन नेटके व खिलाडूवृत्तीने झाले पाहिजे. शाळा व शिक्षकांनी मुदतीत प्रवेश नोंदविणे, क्रीडा प्रवेशिका देणे, पंच परीक्षा, क्रीडा कार्यशाळेत सहभागी होऊन शिक्षकांनी ज्ञान वाढवले पाहिजे. तक्रार समिती व स्पर्धा आयोजन समिती गठीत करून स्पर्धा घ्या. शिल्लक व चालू प्रमाणपत्राचे योग्य वितरण करावे.'

जिल्हा क्रीडा अधिकारी विद्या शिरस यांनी, स्पर्धा प्रवेशिका मुदतीत सादर करा. नंतर मुदत वाढवून दिली जाणार नाही. स्पर्धेची तसेच इतर माहिती सांगितली. १४ वर्षांखालील खेळाडूस स्पर्धा सहभागासाठी शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र आवश्यक आहे. परराज्यातील खेळाडूंच्या कागपत्रांची योग्य तपासणी करण्यात येईल. उत्तेजक द्रवांचा वापर करण्यात येऊ नये. संघटनात्मक व वैयक्तिक वाद नकोत. शहराच्या फुटबॉल, क्रिकेट स्पर्धा अन्य ठिकाणी न घेता विभागीय क्रीडा संकुल वा छत्रपती शिवाजी स्टेडियम येथे घेण्यात याव्यात. राहण्याची सुविधा, तक्रार निवारण समितीबाबत त्यांनी मत व्यक्त केले.

प्राथमिक शिक्षण समितीचे प्रशासनाधिकारी डी. सी. कुंभार यांनी प्रास्ताविक केले. प्रा. संतोष कुंडले यांनी स्वागत केले. विवेकानंद कॉलेजचे जिमखाना प्रमुख डॉ. विकास जाधव यांनी पुस्तक दिले. क्रीडा निरीक्षक सचिन पांडव यांनी आभार मानले. तालुका क्रीडा अधिकारी सुधाकर जमादार, बाळासाहेब कांबळे, सीमा पाटील, रविभूषण कुमठेकर, अनिकेत बोडके, सोनल सावंत, अजिंक्य चौगुले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, संदीप जाधव उपस्थित होते.

### स्पर्धेसाठी सूचना

- जन्मदाखला, पहिलीतील शाळा रजिस्टरची साक्षांकित प्रत,
- ऑनलाईन प्रवेशिका, ओळखपत्र, आधार कार्ड/ पासपोर्ट आवश्यक
- प्रवेशिकेवर नाव असणाऱ्या क्रीडा शिक्षकांची उपस्थिती अनिवार्य
- राष्ट्रीय स्पर्धेसाठी पात्र खेळाडूंची वय चाचणी संबंधित शाळांनी करणे अनिवार्य
- पंच, संबंधित खेळ अधिकाऱ्यांचा निर्णय अंतिम असेल
- स्पर्धेदरम्यान दुखापत, दुर्घटना झाल्यास संयोजन समिती जबाबदार नाही
- राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजनेतून कार्यवाही